Dr. Deepak Gokhale
98220 6 8840

# शेअर मार्केटचा अभ्यास...

## अहो पण म्हणजे नेमकं काय ???




डॉ. दिपक गोखले

( 98220 6 8840 )

www.shareguru.net

मंडळी.....

शेअर मार्केट हा आपल्यापैकी बहुतेजनांसाठी दूरचा दिवा असतो.....

हो ना ?

शेअर मार्केट हा सट्टा आहे, जुगार आहे..... पैसे घालवायची(च) जागा आहे..... इथे व्यवसाय करणं हे फक्त श्रीमंतांच(च) काम आहे..... यासाठी अकाउंट्सचं ज्ञान हवं..... इत्यादी इत्यादी अनेकानेक (ठामम्ठाम) गैरसमजात गुरफटलेली मंडळी मी वर्षानुवर्ष पहात आलेलो आहे.....

पण खरंच असं आहे का ?

चला तर मग आपण शेअर मार्केटकडे थोड्या वेगळ्या नजरेने बघू.....

इतर कोणत्याही क्षेत्राप्रमाणे या इथेही अभ्यासाची, विषय मुळापासून समजून घ्यायची आणि महत्वाचे म्हणजे वेगळ्या दृष्टीकोनाची गरज असते....

आता अभ्यास म्हणजे काय ? तर शेअरचे फंडामेंटल अनालिसिस किवा टेक्निकल अनालिसिस...

Dr. Deepak Gokhale
98220 6 8840

पण एखादी कंपनी कितीही जरी फंडामेंटली मजबूत असली तरीही तिचा शेअर हा मार्केटमध्ये वर खाली होतच असतो. कोण म्हणेल की क्रूड ऑईल चांगले नाहीये ? पण ते सुद्धा जर 120 डॉलर वरून 50 डॉलरवर येतं, सोनं 3100 वरून 2600 वर आलेलं दिसतं तर तिथे कंपन्यांच्या शेअर्सबद्दल काय सांगावं ? म्हणूनच केवळ फंडामेंटली मजबूत आहे या विश्वासावर बँका, आयटी, फार्मा, ऑटो वगैरे अनेक क्षेत्रातल्या कंपन्यांचे शेअर घेतलेल्या आणि अशा कंपन्यांमध्ये आत्यंतिक चढ उतार झाल्यामुळे आपली गुंतवणूक धोक्यात येऊनही अट्टाहासाने ती सपशेल नुकासानातली किंवा जुजबी नफ्यातली गुंतवणूक महिनोंमहिने तशीच पहात बसणारे अनेकानेक जण आपल्याला दिसतात.....

इथं एक महत्वाची गोष्ट म्हणजे इतक्या साऱ्या कंपन्यांची बॅलन्स शिट, पीई / ईपीएस वगैरे रेशो, मॅनेजमेंटची विश्वासार्हता, प्रॉडक्टचा बाजारातील ग्रोथ रेट, कंपनीची पत, देशाची अर्थव्यवस्था, जागतिक बाजारांचे विस्लेषण, बजेट, राष्ट्रीय उत्पन्न, पतधोरण, डॉलर /ऑइल च्या किमतीतील चढउतार, रिझर्व बँकेचे निर्णय, सरकारी धोरणं या आणि अशा अनेक बाबी तपासून मग निर्णय घेण्याची क्षमता, त्यासाठी द्यावा लागणारा वेळ, त्यासाठी अत्यावश्यक असलेलं ज्ञान आणि अनुभव आपल्यात खरोखरच आहे का याचं निष्पक्ष शुद्ध आणि स्वत:शी प्रामाणिक राहून आत्मपरीक्षण करणे खूपच गरजेचे असते.....

यावर उपाय(!) म्हणून बरेचजण या विषयाला वाहिलेल्या वेबसाईट्स पहातात, पेपर / मासिकं वाचतात, टीव्ही चॅनल बघतात, ब्रोकरचे सल्ले घेतात, मित्रांचं ऐकतात..... किंवा "मला वाटतय....." या भूमिकेतून निर्णय घेतात..... पण.....

इतकं सारं करून शेअर घ्यायला जावं तर भलतच चित्र दिसतं..... मग "आम्ही शेअर घेतला की तो पडतो आणि विकला की तो चढतो" अशी दुख-दर्दभरी वाक्य आपल्याला कायमच ऐकायला मिळतात.....

मग याला काही उत्तर आहे का नाही ? आहे ना..... अगदी नक्की आहे.....

आणि ते म्हणजे टेक्निकल अनालिसिस.....

याचं माझं कारण असं की आपण नेहमी मान खाली घालून नम्रपणे मार्केटला फॉलो करावं. मार्केट नेहमीच सुप्रीमो असतं. मार्केट नेहमीच बरोबर असतं. मार्केटला जर वाटलं की (उदाहरणार्थ) टाटा मोटर्सच्या शेअरला वर न्यावं तर आपण टाटा मोटर्सचा शेअर विकत घेतला पाहिजे आणि मार्केटला जर वाटलं की टाटा मोटर्सच्या शेअरला पाडावं तर आपण टाटा मोटर्सचा शेअर गपगुमान विकून मोकळं झालं पाहिजे.....

मग या ठिकाणी ती कंपनी किती चांगली आहे किंवा तिचे फंडामेंटल्स किती उत्तम आहेत या चर्चा निरर्थकच ठरतात.....

हे कसं आहे तर "किती वाजले ?" असं जर कोणी विचारलं तर आपली नजर झटकन घड्याळाकडे जाते. मग आपण सूर्याच्या पोझिशनकडे बघत नाही, वाळूत काठी रोवून सावलीवरून अंदाज बांधत

नाही, मित्र / नातेवाईक / शेजारी यांच्याशी चर्चा करत नाही किंवा "मला वाटतय....." या भूमिकेतून अंदाजपंचे उत्तर देत नाही. आपण फक्त आणि फक्त घड्याळच बघतो. हो ना ?

हेच टेक्निकल अनालिसिस आणि आपल्याला फक्त हेच करायचंय. जेव्हा जेव्हा आपल्याला शेअर घ्यायचाय किंवा विकायचाय तेव्हा तेव्हा आपण फक्त आणि फक्त चार्ट बघायचाय.....

पण असंच का ?

तर इथं हे "मार्केट" म्हणजे नेमकं काय आहे ते आपण पाहू. या "मार्केट" मधल्या खेळाडूंचे दोन गट करता येतील. पहिल्या गटात किरकोळ रकमा घेऊन आलेले तुम्ही-आम्ही ज्यांना "सामान्य गुंतवणुकदार" या नावाने ओळखले जाते. तर दुसऱ्या गटात असतात कोट्यावधी-अब्जावधी रुपयांची पाशवी आर्थिक ताकद असलेले FII, DII, HNI, म्युचूअल फंड्स वगैरे सारखे बलाढ्य धनदांडगे मातब्बर......

सहाजिकच या खेळात मार्केटला वळवण्याची वाकवण्याची ताकद दुसऱ्या गटात असणार हे अगदी उघड आहे. त्यामुळेच आपण एक सर्व बाजूने दुबळे (अति)"सामान्य गुंतवणूकदार" आहोत हे सर्वप्रथम नम्रपणे मान्य करणं गरजेचं असतं आणि हे एकदाका मान्य केलं की त्या दुसऱ्या शक्तिशाली गटाला फॉलो करणं एवढच आपल्या हातात उरतं.....

पण ही बडी मंडळी काय करणार आहेत हे ती आपल्या कानात येऊन सांगणार नाहीयेत. पण ही बडी मंडळी ज्या ज्या बाय किंवा सेलच्या ॲक्शन्स घेतात त्या सर्व शेअर मार्केटच्या माध्यमातूनच. त्यामुळे मार्केट या ॲक्शन्सची नोंद ठेवतं आणि वेळोवेळी ती प्रसिद्ध करतं ज्याला म्हणतात "मार्केट डेटा". या "मार्केट डेटा" चं चित्रात किंवा चार्टमध्ये रुपांतर आणि त्या चार्टचा अभ्यास / अनालिसिस याला म्हणतात "टेक्निकल अनालिसिस". हे बरचसं मार्केटच्या कार्डीओग्राम प्रमाणेच असतं.....

मान्य करतो की इतर कोणत्याही शास्त्राप्रमाणेच अंदाजे 300 वर्ष जुनं असलेलं हे शास्त्रही परफेक्ट नाहीये. पण मार्केटची दिशा कळायला याने नक्कीच मदत होते. गाडीच्या टायरकडे फक्त बघून कोणीही सांगू शकणार नाही की आत्ता यात हवा किती आहे ते. तिथे मीटर लाऊन मोजमाप करायलाच हवे ना ? त्याचप्रमाणे शेअर विकत घेताना आणि विकताना त्याचे मोजमाप चार्टवर करणं आत्यंतिक गरजेचं ठरतं.....

इथं एक अतिशय महत्वाचा मुद्दा..... चार्ट हे मार्केटप्रमाणे वाटचाल करतात. पण..... मार्केट हे चार्टचं गुलाम नसतं..... त्यामुळे कितीही काटेकोर चार्ट अनालिसिस केलं आणि आपली पोझिशन घेतली तरी बाह्य गोष्टींच्या प्रभावामुळे हे मार्केट कधीही अचानक आपली दिशा बदलून उलटी वाटचाल करू शकते. याने आपली गुंतवणूक धोक्यात येऊ शकते आणि आपले नुकसानही होऊ शकते.....

पण हे आधीच ओळखून आपण जर अत्यावश्यक अशा "STOP-LOSS" टेक्निकचा वापर केला तर आपले नुकसान आपण नक्कीच मर्यादित करू शकतो.....

हे नुकसान गृहीत धरून आणि ते कमीतकमी कसे होईल हे पाहून Calculated Risk घेऊन जर धाडसी पावले (पण शास्त्रोक्त पद्धतीने) टाकली तर निश्चितच हे मार्केट आपल्याला दोन्ही हाताने भरभरून दिल्याशिवाय रहात नाही.....

मग चला तर अशा या मार्केटची, त्यात वापरायच्या तंत्र-मंत्रांची अगदी व्यवस्थित ओळख करून घेऊया आणि एका दमदार नव्या अनोख्या आयुष्याला उत्साहाने सुरवात करुया.....

**डॉ. दिपक गोखले**

( 98220 6 8840 )

शेअर मार्केट
क्लासेस
डॉ. दिपक गोखले
98220 6 8840

**www.shareguru.net**